जिल्हाधिकारी कार्यालय, बीड

फोन क्र.०२४४२/२२२६०४ (नगर विकास शाखा) फॅक्स क्र.०२४४२/२२२०११


---

जा.क्र.2016/एमयुएन/डेस्क-1/नपा/भरती/कावी दिनांक- 03 /01/2017

प्रति,

श्री/श्रीमती

(सोबतच्या महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रीकी सेवा (स्थापत्य) श्रेणी-क,संवर्गाची अंतरिम निवड व प्रतिक्षा यादीप्रमाणे)

**विषयः-सरळसेवा भरती प्रक्रिया-2016**

महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रीकी सेवा (स्थापत्य) श्रेणी-क,संवर्गाची अंतरिम निवड व प्रतिक्षा **यादीतील उमेदवारांनी कागदपत्र पडताळणीस उपस्थित राहणे बाबत.**

**संदर्भः-**या कार्यालयाची जाहिरात क्र.2/2016/जिबी/डेस्क-1/एमयुएन/कावी दिनांक14.9.2016

जिल्हा निवड समिती,बीड मार्फत बीड जिल्हयातील नगरपरिषदांच्या आस्थापनेवरील **महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रीकी सेवा(स्थापत्य) श्रेणी-क** संवर्गातील रिक्त पदे भरणेसाठी पात्र उमेदवारांकडुन विहीत नमुन्यातील ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले होते.त्यानुसार पात्र उमेदवारांची लेखी परिक्षा दिनांक 2.10.2016 व दिनांक 9.10.2016 रोजी घेण्यात आली.

सदर लेखी परिक्षेत उतीर्ण होऊन खालिल प्रमाणे अंतरिम गुणवत्ता(अंतरिम निवड व अंतरिम प्रतिक्षा **यादी) प्रसिध्द करण्यात येत आहे.सदर यादीत आपले नाव समाविष्ट असुन आपण <u>दिनांक 6 .01.2017 रोजी सकाळी 11.00 वाजता जिल्हा नियोजन समिती सभागृह,जिल्हाधिकारी कार्यालय,बीड येथे कागदपत्र पडताळणीसाठी उपस्थित रहावे.</u>**

कागदपत्र पडताळणीस येताना खाली नमुद केले प्रमाणे सर्व मुळ कागदपत्र/प्रमाणपत्र त्याच्या साक्षांकीत छायाप्रतिच्या एक संचासह वर नमुद ठिकाणी व वेळी स्वखर्चाने न चुकता उपस्थित रहावे.आपण विहीत वेळेत व दिवशी उपस्थित न राहिल्यास गुणवत्तेप्रमाणे पुढिल उमेदवारांचा विचार करण्यात येईल.याबाबत आपणास कोणताही दावा सांगता येणार नाही.

1. संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या अर्जाची प्रत
2. भारतीय स्टेट बँकेमध्ये परिक्षा फी भरलेल्या चलनाची मुळ प्रत
3. भारतीय नागरीक आसल्याबाबत प्रमाणपत्राची (Nationality)मुळ प्रत
4. महाराष्ट्र राज्याचा अधिवास असल्याबाबतचे प्रमाणपत्राची (Domicile)मुळ प्रत
5. महाराष्ट्र राज्य विभागीय शिक्षण मंडळ माध्यमीक शालांत परिक्षा(S.S.C)उतीर्ण असल्याबाबतचे गुणपत्रकाची व प्रमाणपत्राची मुळ प्रत तसेच महाराष्ट्र राज्य विभागीय शिक्षण मंडळ उच्च माध्यमीक शालांत परिक्षा(H.S.C)उतीर्ण असल्याबाबतचे गुणपत्रकाची व प्रमाणपत्राची मुळ प्रत
6. मान्यताप्राप्त विदयापीठाची स्थापत्य अभियांत्रीकी पदवी(B.E.Civil) किंवा पदविका (D.E.Civil)समकक्ष असणे आवश्यक आहे
7. शाळा सोडल्याच्या दाखल्याची (L.C/T.C) मुळ प्रत
8. सामाजीक आरक्षणांतर्गत निवड झालेल्या उमेदवारांनी (मागासवर्गीय)मुळ जात प्रमाणपत्र व उपलब्ध असल्यास मुळ जात वैधता प्रमाणपत्र
9. महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचीत जाती,अनुसूचीत जमाती,भटक्या जाती,भटक्या जमाती,विशेष मागासवर्ग,ईतर मागासवर्ग यांचेसाठी आरक्षण अधिनियम 2001(सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्र.8मधील कलम 4(2) (दोन)मधील परंतुकान्वये उन्नत व प्रगत गटाच(क्रिमीलियर) तत्व,विजा-अ,भज-

जिल्हाधिकारी कार्यालय, बीड
फोन क्र.०२४४२/२२२६०४ (नगर विकास शाखा) फॅक्स क्र.०२४४२/२२२०११

---

हया प्रवर्गांना लागु करण्यात आलेले आहे.त्यानुसार शासन परिपत्रक क्र.सीबीसी10/2006/प्र.क्र.15/मावक5,दिनांक 30.6.2016 मधील सोबतच्या सुधारीत नमुन्यात 2016-17 हया कालावधीकरीता म्हणजे दि.31.3.2017 पर्यंत वैध असलेले उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमिलीयर) मुळ प्रमाणपत्र.

10. खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी असलेले आरक्षण महिला व बालविकास विभाग शासन निर्णय क्र.82/2001/मसेआ-2000/प्र.क्र.415/का-2 दि.25.5.2001 आणि तदनंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमीत केलेल्या आदेशानुसार आरक्षण अंतर्गत अर्ज करणाऱ्या महिला उमेदवारांनी वर्ष 2016-17 या कालावधी करीता वैध असलेले (अर्थात दि.31.3.2017 पर्यंत वैध असलेले)उन्नत व प्रगत गटात मोडत नाल्याबाबतचे (नॉन क्रिमिलीयर )मुळ प्रमाणपत्र.
11. अंशकालीन कर्मचारी यांनी त्यांच्या अनुभवाचे सेवायोजन कार्यालयाकडे केलेल्या नोंदणीचे प्रमाणपत्र आणि अंशकालीन कर्मचारी म्हणुन कामकाज केले असल्याबाबतचे सक्षम प्राधिकारी यांचे मुळ प्रमाणपत्र.
12. माजी सैनीकांनी जिल्हा सैनिक कल्याण मंडळाकडे नाव नोंदणी केलेबाबतचे प्रमाणपत्र व सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले सैनीकी सेवे संदर्भातील मुळ प्रमाणपत्र सादर करावे.मृत माजी सैनीकाच्या कुटुंबातील व्यक्ती आसल्यास तसे नामनिर्देशन प्रमाणपत्र सादर करावे.
13. महाराष्ट्र शासन माहिती तंत्रज्ञान(सा.प्र.वि)विभागाकडील शासन निर्णय क्र.मातस 2012/प्र.क्र 277/39,दिनांक4.2.2013 मध्ये नमुद केलेल्या संगणक/माहिती तंत्रज्ञान विषयक अर्हता परीक्षा उत्तीर्ण असल्याबाबतचे मुळ प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ मुंबई यांचेकडील अधिकृत M.S.CIT अथवा D.O.E.A.C.C सोसायटीच्या अधिकृत C.C.C किंवा Oस्तर A किंवा Bकिंवा Cस्तर पैकी कोणतीही एक परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे मुळ प्रमाणपत्र
14. महाराष्ट्र नागरी सेवा(लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र)नियम 2005 मधील तरतुदीनुसार गट अ ते ड मील पदांच्य सेवा प्रवेशासाठी एक आवश्यक अर्हता म्हणुन विहीत नमुन्यातील लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहील.
15. छायाचीत्र ओळखपत्र पुरावा(ओळखपत्र/Photo Identity Card)
16. कागदपत्र पडताळणीमध्ये निदशर्नास आलेल्या वस्तुस्थितीनुसार निवडयादी व प्रतिक्षा यादी दुरुस्ती करणे किंवा रद्य करणे याचे सर्व अधिकार अध्यक्ष,जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी बीड यांना राहतील.
17. उक्त सर्व उमेदवारांना कागदपत्राची पुर्ण पडताळणी तसेव जाहीरातीत नमुद सर्व निकषांची पुर्तता झाल्याशिवा नियुक्ती आदेश देण्यात येणार नाही,याची नोंद घ्यावी.

अध्यक्ष,जिल्हा निवड समिती
तथा जिल्हाधिकारी,बीड